**विशेष दिवाणी दावा क्रं.२३/२०२० मधील**

**नि.२१ वर आदेश**

सी एन आरःMHKO050006222020

**सुजाता सेवेकरी (माळी) विरुध्द विमल माळी**

प्रस्तुतचा अर्ज (नि.२१) हा प्रतिवादी अगर तर्फे इसम, एजंट, नोकर यांनी दावा मिळकत अन्य कोणासही कशाही प्रकारे तबदील करु नये अगर तिऱ्हाईत इसमाचा हक्कसंबंध, हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णनः**–

२. जिल्हा परिषद व तु. कोल्हापूर पोट तुकडी व ता. हातकणंगले पैकी मौजे हुपरी गावचे हद्दीतील शेतजमीन गट नं. ७५० क्षेत्र हे.आर २–२५ यापैकी हे.आर १–७८ ची शेतमिळकत (अधिक स्पष्टरित्या अर्ज कलम १ मध्ये चतुःसिमेसह नमुद केलेली मिळकत.) हा दाव्याचा वादविषय आहे. (येथुन पुढे संक्षिप्त रुपात 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येते.)

**अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहेः–**

३. मूळ जमीन ही वादी व प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार आण्णा गणू माळी यांची वडिलार्जीत मालकीची होती. त्या मिळकतीबाबत वादीने प्रतिवादीसाठी व दुस–या बहिणींचेही वतीने रे.दि.मु.नं.७३/२००८ हा दावा वाटपासाठी व कब्जाकरीता दाखल

केलेला होता. त्याचा निर्णय दि.५/७/२०१४ रोजी झाला व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना प्रत्येकी १/५ हिस्सा देण्यात आला. त्याच्या वाटपाचे काम अंतिम टप्यात आहे.

४. दावा मिळकतीबाबत वाटाघाटी करणेकीरता प्रतिवादी या धरणगुत्ती येथे आल्या व त्यावेळेस वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळत प्रतिवादीने वादीस १०,००,०००/–रुपये रक्कमेला खरेदी देण्याचे ठरले. सदर रक्कम वादीने दि.०९/०२/२०१७ रोजी करारपत्रापुर्वी पासून थोडी थोडी प्रतिवादीला दिलेली आहे. वादी व प्रतिवादी या सख्या बहिणी असलेमुळे वादीने प्रतिवादीकडे पावत्या मागितलेल्या नाहीत. दि.७/०२/२०१७ रोजी वादी, प्रतिवादी व त्यांचा मुलगा यांच्यात ठरलेप्रमाणे दावा मिळकतीचे करारपत्र तयार करणेत आले. त्यावेळेस वेळोवेळी दिलेली रक्कम व प्रतिवादीच्या मुलाच्या अपघाताच्या वेळी दिलेली रक्कम ही करारपत्राची रक्कम म्हणून दाखविण्यात आली. दि.०९/०२/२०१७ रोजीचे करारपत्र वादी व प्रतिवादी यांनी नोटरी केलेले आहे.

५. अशा प्रकारे वादीच्या कथनाप्रमाणे १०,००,०००/– रक्कम पोहोचुन देखील प्रतिवादी खरेदीपत्र करुन देण्यास तयार नाही. त्यामुळे दि.२/१/२०२० रोजी वादीने प्रतिवादीस नोटीस पाठविली. परंतु प्रतिवादीने खोटे नोटीस उत्तर देवून खरेदीपत्र करुन देण्याचे ठरविले. सबब, वादीने प्रस्तुतचा दावा खरेदीपत्र करुन देण्यासाठी केलेला आहे व त्यामध्ये दावा मिळकतीची हद्द व हिस्सा निश्चित झाल्यास ती कोणासही तबदील करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मागितला आहे.

६. प्रतिवादीने समन्स मिळाल्यानंतर हजर झाली व तिने म्हणणे निशाणी २४ दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. तिचे कथनानुसार दावा मिळकतीचे अजुन सरस निरस मानाने वाटप झालेले नाही, तिला १०,००,०००/- रक्कम मिळालेली नाही, प्रतिवादीच्या कथनानुसार करारपत्र बेकायदेशीर आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

७. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, अभिलेखावर दाखल करणेत आलेली कागदपत्रे व सन्माननीय वकिलांचा युक्तिवाद या अनुषंगाने खालील वादप्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे –

| | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी सिध्द करते काय की, सकृतदर्शनी केस तिच्या बाजूने आहे? | होकारार्थी. |
| २) | वादी सिध्द करते काय की, दावेचा समतोल तिच्या बाजूने आहे ? | होकारार्थी. |
| ३) | वादी सिध्द करते काय की, अर्ज नामंजूर झालेस तिचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे? | होकारार्थी. |
| ४) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**–कारणमिमांसा–**

८. अर्ज, म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे सन्माननीय वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ बाबतः</u>–**

९. वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या करण्यात येते.

१०. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतसंबंधीत अदयाप वाटप झालेले नाही. अशा परिस्थितीत, निशाणी ३/१ वरील दि.९/२/२०१७ रोजीच्या करारपत्राचे अवलोकन केले असता, ते नोटराईज्ड करारपत्र असल्याचे दिसून येते. त्यामधील मिळकतीचे वर्णन पाहिले असता, त्यामध्ये ''समाईकातील १/५ हिस्सेप्रमाणे होणारे क्षेत्रापैकी वाटपाने येणारी मिळकतपैकी ०.३५ आर जमीन यापैकी सध्या समाईकातील ०.१५ आर जमीन '' असा उल्लेख आहे. म्हणजेच प्रतिवादी ही तिचा अविभक्त हिस्सा करारपत्राद्वारे वादीला देवू इच्छित होती. त्यामुळे त्या अनुषंगाने सकृत दर्शनी वादीचे कथने असे आहे की, खरेदीची संपूर्ण रक्कम रु.१०,००,०००/– प्रतिवादीस देण्यात आले आहेत. एखादा सह हिस्सेदार त्याचा अविभक्त हिस्सा विक्री करु शकतो. परंतु खरेदीदार हा ताबा घेवू शकत नाही. अशा परिस्थितीत, सकृत दर्शनी केस वादीचे बाजुने आहे.

११. या क्षणी वादीने दावा मिळकतीच्या ताब्याविषयी कोणतीही मागणी केलेली नाही. वादी केवळ प्रतिवादीने दावा मिळकत अन्य कोणासही तबदील करु नये अथवा तिऱ्हाईत इसमास तबदिल करु नये एवढीच मागणी करत आहे. त्यामुळे वादी सकृत दर्शनी हस्तांतरण बाबतचा तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे. वादीने संचकार रक्कम दिलेली होती किंवा नाही, वादीची संचकार रक्कम देण्याची ऐपत होती की नाही हे

केवळ पुराव्याअंती सिध्द होवू शकते. या प्राथमिक क्षणी वादीच्या लाभात नोटराईज्ड करारपत्र आहे. सबब, सकृत दर्शनी वादीचे बाजूने केस आहे.

१२. सबब, वरील चर्चा व विवेचनाच्या अनुषंगाने सकृतदर्शनी केस वादीच्या लाभात आहे. तसेच, संपूर्ण १०,००,०००/– रुपये दिल्याचे वादीचे कथन आहे. त्यामुळे दाव्याचा समतोलदेखील वादीच्या बाजुने आहे. करारपत्र हे नोटरी आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. **त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.**

**वादप्रश्न क्रमांक ४ बाबतः–**

१३. वादप्रश्न क्रं.१ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदविले आहे. त्यामुळे अर्ज नि.२१ मंजूर होणेस पात्र आहे. **सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.**

**आदेश**

१) अर्ज (निशाणी २१) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी अगर तर्फे इसम, एजंट, नोकर यांनी दावा मिळकत अन्य कोणासही कशाही प्रकारे तबदील करु नये अगर तिऱ्हाईत इसमाचा हक्कसंबंध, हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम दावेचे अंतिम निकालापावेतो पारीत करण्यात येतो.

Digitally signed by Amit Pralhad Kokare
Date: 2022.05.06 14:38:35 +0530

दिनांक :–०५.०५.२०२२. (अमित प्र. कोकरे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी,
जिल्हा कोल्हापूर